# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

पात्रता विभाग

---

## परिपत्रक - ११

सर्व सलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक, विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक संकुलांचे संचालक यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व विद्यापीठ परिसरातील संकुलांमध्ये प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या पात्रता कायम करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांपैकी स्थलांतर दाखला (Transfer Certificate) / स्थानांतर दाखला (Migration Certificate) गहाळ झाल्यास अथवा खराब झाल्यास अशा विद्यार्थ्यांची पात्रता कायम करण्यासाठी नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर नियमावली या परिपत्रकासोबत जोडण्यात आली आहे.

उपरोक्त संबंधीत विद्यार्थ्यांचे पात्रता कायम करण्यासंबंधीचे प्रस्ताव सोबत जोडलेल्या नियमावलीच्या अनुषंगाने तयार करुन पात्रता विभागास सादर करण्यात यावेत.

(एस. के. माळी)
**कुलसचिव**

संदर्भ क्र. सोविसो/पात्रता/२०१५-१६/4173

दिनांक - 30 APR 2016

**प्रत माहितीस्तव : परीक्षा विभाग**

# नियमावली

| | |
|---|---|
| **प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयत प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या पात्रतेसाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांपैकी स्थलांतर दाखला (Transfer Certificate) व स्थानांतर दाखला (Migration Certificate) गहाळ झाल्यास अथवा खराब झाल्यास किंवा सदर दाखल्यांची दुबार प्रती देखील गहाळ झाली तर अशा परिस्थितीत संबंधीत विद्यार्थ्याची पात्रता कायम करण्यासाठीची नियमावली.** | |
| १. | महाविद्यालयाने ज्या विद्यार्थ्यांचे स्थलांतर दाखला (Transfer Certificate) / स्थानांतर दाखला (Migration Certificate) किंवा दुबार स्थलांतर दाखला (Transfer Certificate) / दुबार स्थानांतर दाखला (Migration Certificate) हरवला आहे अशा विद्यार्थ्याकडून १००/- रुपयांच्या बॉंड पेपरवर मुळ टि.सी. / स्थानांतर दाखला (Migration Certificate) व दुबार टि.सी. / स्थानांतर दाखला (Migration Certificate) हरवले आहे/गहाळ झाले आहे/खराब झाले आहे जी काही वस्तुस्थिती असेल ती नमुद करावी त्याच बरोबर विद्यार्थ्याने सदर स्थलांतर दाखला (Transfer Certificate) / स्थानांतर दाखला (Migration Certificate) च्या आधारे इतरत्र कोठेही प्रवेश घेतलेला नाही, भविष्यात अशी कुठलीही बाब आढळून आल्यास त्यास विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील व जर इतरत्र प्रवेश घेतल्याचे आढळून आल्यास विद्यापीठाकडून प्राप्त केलेली पदवी काढून घेण्यास किंवा रद्द करण्यास तसेच मला मिळालेले सर्व आर्थिक लाभ परत करण्यास माझी कोणतीही हरकत नाही असे हमीपत्र घ्यावे. |
| २. | महाविद्यालयाने सदर हमीपत्र पात्रता प्रस्तावासोबत जोडून या प्रस्तावात अशा विद्यार्थ्याने इतरत्र प्रवेश घेतल्याचे महाविद्यायाच्या निदर्शनास आल्यास ती बाबत त्वरीत विद्यापीठाच्या निदर्शनास आणली जाईल असे महाविद्यालयाचे हमीपत्र जोडावे. |